NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २६.११.२०२६ गुरूवार

(कामगिरी)

नंदनवन पोलीसांची कामगिरी :– नायलॉन मांजा बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २६.११.२०२६ चे ०२.१५ ते ०२.४५ वा. चे दरम्यान, नंदनवन पोलीसांचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नंदनवन झोपडपट्टी गल्ली नं. ४ येथे राहणारा ईसम हा त्याचे राहते घरून शासनाने प्रतीबंधीत केलेला नायलॉन मांजा विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, प्राप्त वर्णनाचा ईसम मिळुन आला. त्यास नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव दिनेश रामकृष्ण तितरमारे, वय ५० वर्षे असे सांगीतले. त्याचे राहते घराची पाहणी केली असता, एका निळ्या रंगाचे कापडी थैलीत शासनाने प्रतीबंधीत केलेला नायलॉन मांजा मोनोफिल गोल्ड लेबल असलेल्या मांजाच्या एकुण ०८ चक्री/कोन मिळुन आल्या. आरोपीचे ताब्यातुन एकुण ०८ चक्री किंमती ८,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीचे कृत्य हे कलम २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम– १९८६ अन्वये होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

वरील कामगिरी वपोनि. कैलाश देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. प्रदीप काईट, पोहवा. अश्वीन सहारे, पोअं. संजय मुकदम, संजय चौधरी व मपोअं. कांचन परीहार यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे नंदनवन :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २५.११.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, कुंभारटोली झेंड्याजवळ काळी टिशर्ट घातलेला एक इसम शस्त्र घेवून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव तुषार मनोज दाते, वय २५ वर्षे रा. बगडगंज, शिलगंध बुध्द विहार जवळ, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याने घातलेल्या पॅन्टचे आंत कंबरेत लपविलेला एक लोखंडी चाकु किंमती ३००/– रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे पारडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २५.११.२०२६ चे १८.३० वा. ते दिनांक २६.११.२०२६ चे ०३.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, प्लॉट नं. ०७, श्री ओमसाई नगर, कटरे सोसायटी, पुनापुर चौक, नागपूर येथे राहणारे फिर्यादी पवन मेवालाल गुप्ता, वय ४४ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाचे लग्नाकरीता, गोरेवाडा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ३,५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,८२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. भागवत काळींगे यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे अजनी :— पोलीस ठाणे अजनी हद्दीत, प्लॉट नं. १४, हनुमान नगर येथे राहणाऱ्या फिर्यादीच्या सासु नामे श्रीमती निशा केशवराव बलविर, वय ७६ वर्षे ह्या घरी एकट्या असल्यास कुठेही निघुन जात असल्याने फिर्यादी हे घराला कुलुप लावुन कामावर जात होते. सकाळी ०९.३० वा. केअर टेकर आलेवर दार उघडत होते. दिनांक २६.११.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, केअर टेकर यांनी दार उघडले असता, त्यांना घरामध्ये धुर व जळाल्याचा वास आला व फिर्यादीच्या सासु ह्या बाथरूममध्ये बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्या. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतक यांना शॉटसर्कीट मुळे लागलेल्या आगीमधुन निघालेल्या धुराचा त्रासामुळे त्या बेशुध्द होवुन मरण पावल्या असाव्या.

अशा फिर्यादी डॉ. प्रशांत सदाशिव बडवाईक, वय ५५ वर्षे, रा. प्लॉट नं. १४, हनुमान नगर, अजनी, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे सफौ. दिनेश काकडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(मिसींग)

१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— फिर्यादी अतुल प्रभाकर गुबरे, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. १९५, श्रीकृष्ण नगर हनुमान मंदीर जवळ, मानेवाडा—बेसा रोड, हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांची आई श्रीमती वनमाला प्रभाकर गुबरे, वय ६८ वर्षे ह्या दिनांक २१.११.२०२६ चे १८.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील आपले राहते घरून कुठेतरी निघुन गेल्या असुन, अद्याप बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन—** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ४ इंच, डोळे—काळे, केस—काळे लांब, अंगात— साळी व ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— मराठी, हिंदी बोलतात. ओळख— नाकाचे डाव्या बाजुला मोस आहे.

२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— फिर्यादी सौ. इंदीरा संजु रोहणकर, वय ४४ वर्षे, रा. तुकडोजी नगर, प्लॉट नं. २४७, हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. समेरा संजु रोहणकर, वय १९ वर्षे, रा. वरीलप्रमाणे ही दिनांक २३.११.२०२६ चे ११.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील फिर्यादीचे राहते घरून बेपत्ता झाली आहे. तीचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन—**

रंग–गव्हाळ, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ५ इंच, केस–काळे लांब, अंगात– किळ्या रंगाचा टि–शर्ट व फुलपॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.



श्रीमती वनमाला



कु. समेरा

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.